~~विना अनुदानित~~
~~विना अनुदानित~~

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथमिक]
जा. क्र. जिप/शिक्षण/प्राथ/२/२१/२५८/२००८
पुणे दिनांक: २८/ ५/२००८

प्रति,
सचिव/अध्यक्ष,
प्रतिभा महिला प्रतिष्ठान
चिंचवड गुरव सांगवी
पुणे

विषय: – नविन खाजगी प्राथमिक शाळांना देण्यात आलेल्या परवानगीचे नुतनीकरण बाबत...

संदर्भ: –१] शालेय शिक्षण विभागाकडील,
१] व्हीएलएस–१००१/[३८२/२००१]/प्राशि–३
दिनांक: – ३ जुलै २००२.
२] सम क्रमांक दिनांक– २९ ऑगस्ट २००२ चे व
सम क्रमांक दिनांक– ८ ऑक्टोबर २००२.
३] क्रमांक व्हीएलएस– १००१ /(५४२८ /२००२) / प्राशि –३
दिनांक २४ मे २००२
४] ~~मा. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी/म. शि. अ.~~ पिंपरी चिंचवड म.नगर पालिका पिंपरी पुणे १८
यांचे कडील पत्र जा. क्रमांक शि/ आप्राश/ ३/ कावि /३५५/०८
अन्वये प्राप्त झालेला प्रस्ताव. दि १८/५/२००८

~~उपरोक्त विषया बाबत~~ कळविण्यात येते की, संदर्भ क्र. ३ अन्वये प्रतिभा महिला प्रतिष्ठान पिंपळे गुरव सांगवी पुणे ~~पिंपळे गुरव सांगवी, पुणे~~ ————या संस्थेस ————इंग्रजी——माध्यमाची कायम
ता. ———जि. पुणे या ठिकाणी जून २००१ पासून ————— प्राथमिक शाळा [इयत्ता १ ली च्या वर्ग
विनाअनुदानित/~~विना अनुदानित~~ तत्वावर प्राथमिक शाळा [इयत्ता १ ली च्या वर्गात]
(नवीन)सुरु करण्यात परवानगी देण्यात आली होती.

सदर शाळेचा परवानगी आदेश उशिरा प्राप्त झाल्याने संस्था सदरची शाळा परवानगी मिळाल्या शैक्षणिक वर्षात सुरु करु शकली नाही. त्यामुळे उपरोक्त परवानगीचे नुतनीकरण करणे बाबतचा आपला विनंती प्रस्ताव संदर्भ क्र. ४ अन्वये प्राप्त झालेला आहे.

सदरची विनंती विचारात घेऊन व संस्थेच्या प्रस्तावाचे अवलोकन करता आपल्या संस्थेस संदर्भ क्र. ३ अन्वये नविन शाळा सुरु करण्यास देण्यात आलेल्या परवानगी आदेशाचे नुतनीकरण जून २००२ पासून करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

४८ प्रतिमा दि-३१
संपूर्ण सही असे.

[signature]
शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद पुणे–करिता

प्रत:– माहितीसाठी सविनय सादर,
१] मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–३२.

कायम विना अनुदान तत्वावर

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/३२६/२०१३.
दिनांक :- ३० / ९ /२०१३

प्रति,

मुख्याध्यापिका,
दि न्यु मिलेनियम इंग्लिश मेडियम स्कुल
नवी सांगवी

**विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...**

संदर्भ१) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३,दि.१४/१/०३

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त /नैसर्गिक वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| दि न्यु मिलेनियम इंग्लिश मेडियम स्कुल, नवी सांगवी | इंग्रजी | अतिरिक्त | इ. १ ली ते ४थीच्या ४थ्या तुकडीस व इ. ५ वी ते ७वीच्या ३ ऱ्या तुकडीस |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे:

**अटी व शर्ती :-**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) आर.टी.ई २००९ चे नियमांचे पालन करणेत यावे.

Principal,. Smt. Phadke Mam.
Secondary & Higher Secondary Section
Copy for Information

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

महाराष्ट्र शासन

<u>शासन परवानगी आदेश</u>

क्रमांक इंमाशा २०१०/ ५८/१०/मा
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक ~~एप्रिल~~ १८ मे, २०१०.

प्रति,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते १२ वीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) संस्थेचा दि. २२.२.२०१० रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **प्रतिभा महिला प्रतिष्ठान,पिंपळे गुरव, पुणे** या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वीपर्यंत सुरु असलेल्या **न्यु मिलेनियम इंग्लिश मिडीयम स्कूल, नवी सांगवी , पुणे** येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ.८ वी ते इ.१२ वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकरक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १२ वीच्या वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(डॉ. सुवर्णा सि.खरात)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा. मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे/ शिक्षणाधिकारी (माध्यमिक).जिल्हा परिषद, पुणे
संस्था, प्रतिभा महिला प्रतिष्ठान,पिंपळे गुरव, पुणे

निवड नस्ती, माशि १